# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

जा.क्र.मनपा/पर्यावरण/४७ /२०२३-२४ दि. ०७ / ०७/२०२३

## // परिपत्रक //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कांदळवन व पाणथळ संबंधित प्राप्त तक्रारींकरिता टोल फ्री क्रमांक प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण व पाणथळ संबंधित प्राप्त तक्रारींकरिता महानगरपालिका स्तरावर नागरिकांसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देणेबाबत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत् सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष मुख्य कार्यालय, तळमजला, भाईंदर (प.) येथे कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी दूरध्वनी क्रमांक ०२२-२८११७१०२, ०२२-२८११७०१४ व भ्रमणध्वनी क्रमांक +९१ ८६५७९४९७१५ व +९१ ८२९१३७०१३८ पूर्ण दिवस म्हणजेच २४ तासांकरिता कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण संबंधित प्राप्त तक्रारींकरिता उपरोक्त क्रमांक हे टोल फ्री क्रमांक म्हणून कार्यान्वित करणेत येत आहेत.

तरी आपत्ती व्यवस्थापन कक्ष येथे कार्यरत असलेल्या कर्मचारी यांनी कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण संबंधित प्राप्त तक्रारींची नोंद घेऊन याबाबत श्री. योगेश गुणिजन, सहा. आयुक्त (पर्यावरण), भ्रमणध्वनी क्रमांक ९८९२३०२७३५ यांचेशी संपर्क साधावा.

या कामात कोणीही हयगय व निष्काळजीपणा केल्यास जबाबदारी निश्चित करुन पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(संजय शिंदे)
उपायुक्त (पर्यावरण) तथा
नोडल अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका